# मेट्रो ३ : मोबाईल संवादासाठी एसीस इंडिया कंपनीला कंत्राट

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ या ३३.५ किमी तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गादरम्यान प्रवाशांना मोबाईलच्या माध्यमातून अव्याहत संवादासाठी एसीस इंडिया कंपनीला कंत्राट देण्यात आले आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या माध्यमातून हे कंत्राट ९ वर्षांच्या कालावधीसाठी देण्यात आले आहे. या कराराच्या माध्यमातून २७४ कोटी इतका महसूल मिळणार आहे.

एसीस इंडिया या कंपनीच्या माध्यमातून बंगळुरू विमानतळ आणि सुरत डायमंड बोर्स येथे इन बिल्डिंग सोल्यूशन लागू करण्यात आले आहे. ९ वर्षांच्या कालावधीत मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला २७४ कोटी रुपयांचा महसूल मिळणार असून प्रति स्थानक परवाना शुल्क हे मेट्रो मार्गाच्या २.५ पट आहे. मेट्रो ३ च्या भूमिगत स्थानकांचे मार्ग १० ते १४ मीटर जमिनीच्या खाली व प्लॅटफॉर्म १८ ते २० मीटर खाली असणार आहे. त्यामुळे मोबाईल नेटवर्क आणि इंटरनेट प्रसारासाठी कंपनी नेमणे महत्त्वाचे होते. मेट्रो ३ च्या प्रवासादरम्यान एमएमआरसीने जीओ, व्होडाफोन, एअरटेल आणि एमटीएनएलसारख्या दूरसंचार सेवा देणाऱ्या कंपन्यांकडून सेल्युलर कव्हरेज तैनात करण्याची योजना आखली आहे. यामध्ये भूमिगत स्थानक आणि बोगद्यांमध्ये अँटेना आणि रिपीटर्सची स्थापना करण्यात येणार असून इन बिल्डिग सोल्यूशनद्वारे हे साध्य करण्यात येणार आहे.